**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत नियम २०१७ मधील नियम क्र. १४ नुसार राज्य शासनाच्या सर्व कार्यालयातील दिव्यांग अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती विहित नमुन्यात ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : दिव्यांग-२०२५/प्र.क्र. १८/E Office No.१३९९९४८/कार्यासन-१**

३१,३२,३५ ए, तिसरा मजला, ए-विंग, मित्तल टॉवर, बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग,
नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५

**वाचा :**

१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६,
२) केंद्र शासनाचे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम अंतर्गत नियम, २०१७,
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग -२०१८/प्र.क्र.११४/१६अ, दिनांक २९ मे, २०१९
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग -२०२२/प्र.क्र.८३/१६अ, दिनांक २० एप्रिल, २०२३
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग -२०२२/प्र.क्र.८३/१६अ दिनाकं २९ जुलै, २०२४

**प्रस्तावना:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३४ अन्वये लाक्षणिक दिव्यांगत्व (Benchmark Disability) असलेल्या व्यक्तींना शासनसेवेत दिव्यांगत्वाच्या आधारे निश्चित केलेल्या ५ गटांपैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% आणि गट ड व ई साठी १% याप्रमाणे ४% आरक्षण आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ मे, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीमध्ये लाक्षणिक दिव्यांगत्व (Benchmark Disability) असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदांच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" मधील निम्नस्तरापर्यंतच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण निश्चित केले आहे आणि दिनांक २९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीमधील दिव्यांगांचे आरक्षण दिनांक ३० जून, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत नियम २०१७ च्या नियम १४ अन्वये प्रत्येक शासकीय आस्थापनाने दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती (FORM ३ मध्ये) ठेवण्याबाबत अनिवार्य केले आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक शासकीय/निमशासकीय आस्थापनाने दिव्यांग कर्मचाऱ्याची माहिती विहित नमुन्यात ठेवण्यासाठी सूचना देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३४ अन्वये लाक्षणिक दिव्यांगत्व (Benchmark Disability) असलेल्या व्यक्तींना शासनसेवेत ४ टक्के आरक्षण निश्चित केले आहे. केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत नियम २०१७ च्या नियम १४ अन्वये दिव्यांग आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शासकीय आस्थापनांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख तसेच स्वायत्त संस्था यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट - अ"** प्रमाणे तयार करुन त्यांच्या विभागाच्या संकेतस्थळावर दरवर्षी १ जानेवारी रोजी प्रकाशित करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

२. सर्व प्रशासकीय विभाग व सर्व विभाग प्रमुखांनी दिव्यांगांसाठी असलेल्या रिक्त पदांचा सहामाही आढावा घेतील.

३. आढाव्याअंती अनुशेष भरण्याची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी सोबत जोडलेल्या "परिशिष्ट - अ" प्रमाणे माहिती आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे यांना प्रत्येक वर्षी १ जानेवारी रोजी उपलब्ध करुन द्यावी व त्याची एक प्रत या विभागास उपलब्ध करुन द्यावी.

५. आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे हे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ८३ अन्वये तयार करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालात सर्व विभागांच्या "परिशिष्ट - अ" मध्ये प्रशासकीय विभागनिहाय दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या माहितीचा अंतर्भाव करतील.

६. "परिशिष्ट- अ" नुसार माहिती सादर न केल्यास दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ८९ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

७. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०२९१७४५१६८३३५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUKARAM H
MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.10.29 17:47:16 +05'30'

**( तुकाराम मुंढे )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,

४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.,
६. मा. अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई.,
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.,
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.,
१०.अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.,
११.सचिव, दिव्यांग कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.,
१२.विभागीय आयुक्त (सर्व).,
१३.आयुक्त, महानगरपालिका (सर्व).,
१४.जिल्हाधिकारी (सर्व).,
१५.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६.आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.,
१७.मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.,
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,
१९.मुख्याधिकारी (सर्व).,
२०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
२१.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
२२.प्रादेशिक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी (सर्व).,
२३.सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
२४.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
२५.तहसिलदार (सर्व).,
२६.जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,
२७.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र सी.डी.ओ. बॅरेक नं. १ योगक्षेम समोर, वसंतराव भगवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.,
२८. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय),समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५.,
२९.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई.,
३०.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ००१.,
३१.बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१.,
३२.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमेटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.,
३३.भरतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब, मिल पॅलेस, वरळी, मुंबई.,
३४.महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८.

"परिशिष्ट अ"

(दिव्यांग व्यक्तींच्या नियोक्त्यांसाठी नमुना)
(Sample For Employers Of Persons With Disabilities)

१. मंत्रालयीन विभाग :..................................................

२. शासकीय आस्थापनेच्या वेतन देयकातील एकूण व्यक्तींची संख्या (यांत शासनाकडून ज्यांचे वेतन किंवा पगार दिले जातात अश्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश असावा.) :

३. शासकीय आस्थापनेच्या वेतनदेयकातील (दिव्यांगत्वानुसार) एकूण दिव्यांग व्यक्तींची संख्या (यांत प्रत्येक दिव्यांग व्यक्तीचा समावेश असावा ज्यांचे वेतन किंवा पगार शासकीय आस्थापनेद्वारे दिले जाते.) :

**(अ) सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती (संवर्गनिहाय):**

| संवर्ग/पदनाम (अचूक संज्ञा वापरा) | एकूण कर्मचाऱ्यांची संख्या | दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | | | सेवानिवृत्तीमुळे पुढील कॅलेंडर वर्षात भरल्या जावू शकणाऱ्या प्रत्येक संवर्गातील दिव्यांगांसाठीच्या रिक्त पदांची अंदाजे संख्या द्यावी |
|---|---|---|---|---|---|
| | | दिव्यांग पुरुष | दिव्यांग महिला | एकूण दिव्यांग कर्मचारी | |
| १ | २ | ३ | | | ४ |
| | | | | | |

(ब) जर सहामाहीत नियुक्तीमध्ये ५% पेक्षा जास्त वाढ किंवा घट झाली असेल तर त्यामागील मुख्य कारणे नमूद करण्यात यावी.......................

४. **रिक्त जागा:**

(प्रचलित किमान दरमहा वेतनानुसार आणि सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीच्या एकूण वेतनासह रिक्त जागा.)

(अ) सहामाहीत रिक्त झालेल्या आणि भरल्या गेलेल्या पदांची संख्या.

| कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या रिक्त पदांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|
| रिक्त जागा | अधिसूचित स्थानिक विशेष रोजगार विनिमय केंद्र | सर्वसाधारण पदभरती | भरलेल्या जागा | स्रोत(कोणत्या माध्यमातून भरल्या गेलेल्या-सरळसेवा, पदोन्नती, अनुकंपा इ.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| एकूण | | | | |

(ब) तक्ता ४ (अ) अंतर्गत सर्व रिक्त पदांची माहिती न देण्याची कारणे.............

## ५. मनुष्यबळाची कमतरता

| योग्य अर्जांच्या कमतरतेमुळे रिक्त राहीलेली पदे | | | | |
|---|---|---|---|---|
| संवर्गाचे पदनाम | रिक्त पदांची संख्या | आवश्यक पात्रता | आवश्यक अनुभव | अनुभव आवश्यक नाही |
| | | | | |

६. या शासकीय आस्थापनेला योग्य अर्जदार मिळविण्यात अडचण आली असेल अशा इतर कोणत्याही पदांची यादी ...................

दिनांक: विभाग प्रमुखाची स्वाक्षरी